**चिपळूण नगर परिषद, चिपळूण**
**जाहीर निवीदा सुचना**

केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांचे पायाभूत सुविधांची विकास योजने अंतर्गत चिपळूण नगर परिषदेची जलनिःसारण योजना सादर करणेकामी तपशिलवार प्रकल्प अहवाल तयार करावयाचा आहे. या कामी तज्ञ वास्तुविशारद, इंजिनियर्स, सल्लागार यांचे कडून खालील नमुद तपशिलाप्रमाणे काम करणे कामी **उक्त रक्कम (ठोक दर) पध्दतीने निवीदा** मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| १ | केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांचे पायाभूत सुविधांची विकास योजने अंतर्गत चिपळूण नगर परिषदेची जलनिःसारण व मलनिःसारण योजना सादर करणे कामी योजनेचे मार्गदर्शक सुचना पुस्तीकेमधील सुचनांनुसार सव्वीस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, आवश्यकते नुसार सर्व्हे करणे, पहाणी करणे, प्रस्तावीत कामाचे तपशिलवार नकाशे, आराखडे, अंदाजपत्रके तयार करणे, त्यांना सक्षम प्राधिकरणाची तांत्रीक मान्यता प्राप्त करुन घेणे, प्रकल्पाचे राज्य स्तरीय मान्यता समीती समोर सादरीकरण करुन प्रकल्पास राज्य व केंद्रीय समीतीची मान्यता घेणे, कामाचे नियोजन तक्ते, बारचार्ट तयार करुन देणे, निवीदा मसुदा तयार करुन देणे, प्रकल्प तयार करुन मंजुर करणे कामी नगर पालिका स्तरा पासुन केंद्रीय स्तरा पर्यंत विविध बैठकींना उपस्थित राहणे व माहीती देणे, सादरीकरण करणे वगैरे प्रकल्प अहवाल तयार करणे पासुन केंद्रीय समीतीची मान्यता होईपर्यत सर्व अंतर्भूत कामे करणे. **(सविस्तर प्रकल्प अहावाल तयार करणे काम) (D.P.R.)** | २०,०००/- | कामाचा आदेश दिल्यापासुन तीन महीन्यांचे आत राज्य शासनास अहवाल सादर करणे आवश्यक आहे. |
| २ | वरील प्रमाणे योजना मंजुर झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाची लाईन आउट देणे, प्रत्यक्ष कामावर दैनंदीन देखरेख करणे, कामाबद्दल नगर पालिकेस अहवाल देणे, सक्षम प्राधिकरणाकडून कामाची गुणनियंत्रण चाचणी व मान्यताप्राप्त त्रयस्थ संस्थेकडून लेखा परिक्षण (quality control and third party audit) करुन घेऊन नगर परिषदेस अहवाल सादर करणे. कामाचे दर्जाबद्दल आणि मुदतीत काम पूर्ण होणे बाबत पालिकेस वेळोवेळी माहीती देणे, अहवाल सादर करणे, मुदतीमध्ये काम पूर्ण करुन घेणेकामी कामाचे नियोजन (work plan and bar chart) करणे. कामाची बीले तयार करणे. वगैरे सर्व अंतर्भूत कामे **(सुपरव्हिजन काम)** | २०,०००/- | केंद्र शासना मार्फत योजना मंजुर झाली व निधी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु झाले पासुन काम पूर्ण होई पर्यंत |

**वरील प्रमाणे क्रमांक १ व २ या कामाची स्वतंत्र निवीदा सादर करावी.**

**तपशिलवार निविदा नगर परिषदेची वेबसाईट www.cmcchiplun.org वर उपलब्ध आहे.**

१. निवीदा फॉर्मची किंमत : रुपये १०००.००
२. निवीदा फॉर्म विक्री करणेची मुदत : दिनांक २५/०८/२००९ ते ३१/०८/२००९
पर्यत शासकिय सुट्यांचे दिवस सोडून
३. निवीदा पूर्व बैठक : ०१/०९/२००९
३. निवीदा अनामत जमा करणेची
अंतीम तारीख : ०२/०९/२००९
४. निवीदा फॉर्म स्विकारणे अंतीम तारीख : ०४/०९/२००९ दुपारी २.०० वाजेपर्यंत

**कोरा निवीदा फॉर्म मिळणेसाठी आवश्यक कागदपत्र.**

१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
२. अनुभवाचे दाखले अथवा कामाचे आदेश
३. वास्तु विशारदांसाठी कौन्सील ऑफ आर्कीटेक्टशी नोंदणीकृत / संलग्न असल्याचे प्रमाणपत्र.
४. तज्ञ अभियंते/ सल्लागार यांचे संदर्भात त्यांनी मान्यता प्राप्त विद्यापिठाची तंत्रशिक्षण मंडळाची पदवी / पदविका धारण केली असल्या बाबत प्रमाणपत्र.

निवीदा स्विकृतीसाठी प्राधान्यक्रम

१. सर्वात कमी दराची निवीदा स्विकारणेत येईल.
२. केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांचे पायाभूत सुविधांची विकास योजने अंतर्गत अथवा केंद्र व राज्य शासनाचे विविध योजनांचे प्रकल्प अहवाल तयार करणेचा अनुभव असणे. अशा कामांचे दाखले, कामाचे आदेश जोडणे आवश्यक आहे.
३. अशा योजना तयार करणेसाठी आवश्यक तो तज्ञ कर्मचारी वर्गाची उपलब्धता असावी. (स्टाफ प्रोफाईल जोडणे आवश्यक.)

**निवीदे सोबत लखोटा क्रमांक १ मध्ये जोडावयाचे कागदपत्र**

१. इसारा रक्कम जमा केल्याचे पावतीची, किवा डि.डि. अथवा मुदतठेव पावतीची झेरॉक्स प्रत
२. अनुभवाचे प्रमाणपत्र
३. संस्था नोंदणी प्रमाणपत्र
४. वॅट नोंदणी क्रमांक असल्यास प्रमाणपत्र.
५. वॅट नोंदणी नसल्यास तसे पत्र.
६. कंपनी/फर्म/स्टाफ प्रोफाईल

निवीदा लखोटा क्रमांक २ मध्ये जोडावयाचे कागदपत्र.

कोऱ्या निवीदा फॉर्म मध्ये संबंधीत रकान्यामध्ये ठोक दर नमुद करावेत. व असा मूळ निवीदा फॉर्म लखोटयामध्ये ठेवावा.

टिप :- १. दोनही लखोटे योग्य पध्दतीने बंद करुन लाखेने सिलबंद करावेत.
२. निवीदा दर स्पष्टपणे खोडाखोड न करता अक्षरी व अंकामध्ये नमुद करावेत.

आलेल्या सर्व निवीदा स्विकारणेचा अथवा कोणतेही कारण न देता फेटाळणेचा अधिकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवला आहे.

चिपळूण नगर परिषद कार्यालय
चिपळूण दिनांक :- ०८/२००९
निवीदा सुचना क्रमांक :-

गणेश शेटे
मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद

अजमल पटेल
नगराध्यक्ष
चिपळूण नगर परिषद